वर्ष- १२ | अंक- ३३ | मुंबई, मंगळवार,३० जुन २०२६ ते ६ जुलै २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
घारापुरी एलिफंटाच्या नव्या उत्खननात सापडल्या ह्याहून गोष्टी, ज्यामुळे उलगडली इतिहासातली अनेक रहस्यं

3 ईडीने दिली टाळी, आता केरळची पाळी!

नीट परीक्षार्थी विद्यार्थिनीला अंबरनाथ पोलिसांची तात्काळ मदत 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com



पत्रकारांना धमकावणाऱ्यांना थेट जेलची हवा !

पत्रकारांना धमकी म्हणजे लोकशाहीला आव्हान; दोषींना कोणतीही माफी नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई। पत्रकारांना धमकावणे, मारहाण करणे किंवा त्यांच्या कामात अडथळा आणणाऱ्यांना थेट कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. माध्यम स्वातंत्र्यावर होणारे हल्ले लोकशाहीवर आघात मानले जातात आणि अशा गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाते. पत्रकारांच्या संरक्षणासाठी आणि त्यांना धमकावणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी कायदेशीर तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायदा (२०१७): महाराष्ट्र हे पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांविरुद्ध कायदा करणारे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्यानुसार, पत्रकारांना धमकावणे, मारहाण करणे किंवा त्यांच्या संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान करणे हा गंभीर गुन्हा आहे. कडक शिक्षा आणि दंड: दोषी व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास किंवा ५०,००० रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. नुकसान भरपाई: हल्लेखोरांकडून पत्रकाराला झालेल्या दुखापतीसाठी किंवा मालमत्तेच्या नुकसानासाठी दुप्पट भरपाई वसूल करण्याची तरतूद या कायद्यात आहे. कायदेशीर कलमे (IPC/BNS): पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देणे किंवा बळजबरी करणे यासारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी भारतीय दंड संहिता (IPC) किंवा नवीन कायद्यांनुसार खालील कलमांखाली गुन्हे दाखल होऊ शकतात: कलम ५०६: गुन्हेगारी धमकी देणे (Criminal Intimidation).कलम ३५३: सरकारी किंवा अधिकृत कर्तव्य बजावत असलेल्या व्यक्तीला (पत्रकार) काम करण्यापासून रोखणे किंवा हल्ला करणे. कलम ३४१/३४२: बेकायदेशीरपणे वाट अडवणे किंवा डांबून ठेवणे.पत्रकारांच्या सुरक्षेबाबत सरकार आणि न्यायालय अत्यंत संवेदनशील आहेत. पत्रकारांना धमक्या आल्यास संबंधित पोलीस ठाण्यात थेट तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

मुख्यमंत्र्यांचे ठोस निर्देश

- पत्रकारांना धमकावणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.
- संबधित आरोपींविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करून अटक करावी.
- प्रकरणांची दुतगतीने सुनावणी होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.
- पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.
- पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष यंत्रणा उभारावी.

पत्रकार
पत्रकारांवरील हल्ले सहन केले जाणार नाहीत लोकशाहीची ताकद माध्यमांची स्वातंत्र्या!



‘ पत्रकारांना धमकी देणे म्हणजे लोकशाहीला आव्हान देणे होय. अशा कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या कोणालाही माफी दिली जाणार नाही. माध्यमांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे ही सरकारची जबाबदारी असून पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासन कटिबद्ध आहे.
- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

तमिळनाडूत लपलेल्या खूनप्रकरणातील फरार आरोपीला ठाणे गुन्हे शाखेची अटक




हि कारवाई पोलीस उपनिरीक्षक सुरेश माळोदे, पोलीस हवालदार धनराज घोडके, पोलीस शिपाई योगेश क्षीरसागर, अशोक ढवळे, संजय करंकाळ आणि दत्ता घोडके (तांत्रिक मदत) यांच्या पथकाने केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

ठाणे। शिळ-डायघर पोलीस ठाण्यात सन २०२५ मध्ये दाखल झालेल्या खूनप्रकरणातील एका फरार आरोपीला तब्बल दीड वर्षानंतर तमिळनाडूमधून ताब्यात घेण्यात ठाणे गुन्हे शाखेला यश आले आहे. अटक टाळण्यासाठी आरोपी सतत ठिकाणे बदलून राहत असल्याची माहिती समोर आली आहे. शिळ-डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०३(१), १०९, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) (३), ३(५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), १३५ अन्वये २२ जानेवारी २०२५ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी समीम सगीर अहमद हाश्मी (वय २५) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. अटक टाळण्यासाठी तो विविध ठिकाणी वास्तव्य करून आपले अस्तित्व लपवत होता. दरम्यान, आरोपी तमिळनाडू राज्यातील रामनाथपुरम जिल्ह्यातील एरवडी येथे असल्याची माहिती पोलीस हवालदार धनराज घोडके यांना गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीनंतर विशेष पथक तमिळनाडूकडे रवाना करण्यात आले. पथकाने एरवडी येथील बिस्मिल्लाह गेस्ट हाऊससमोरील परिसरात सापळा रचून १७ जून २०२६ रोजी आरोपीला ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणीनंतर आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी १८ जून रोजी शिळ-डायघर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.

१०० दिवसांच्या कृती आराखड्याला प्रतिसाद; ठाणे पोलीसांच्या तक्रार निवारण दिनात ६८६ अर्जांची जागेवरच निर्गती



ठाणे। ठाणे : नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे जलद आणि प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने ठाणे पोलीस आयुक्तालयात १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या ह्यातक्रार निवारण दिनाह्नला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २० आणि २१ जून रोजी पार पडलेल्या या उपक्रमात १,०८३ अर्जदारांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी ८७६ अर्जदार प्रत्यक्ष उपस्थित राहिले. या तक्रार निवारण दिनासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारींची प्रत्यक्ष सुनावणी करून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. या उपक्रमादरम्यान एकूण ६८६ अर्जांची अर्जदारांसमक्ष जागेवरच निर्गती करण्यात आली. उर्वरित अर्जांच्या संदर्भात संबंधित अर्जदारांना बोलावून त्यांच्या तक्रारींचेही लवकरात लवकर निराकरण करण्याचे नियोजन पोलीस प्रशासनाने केले आहे. तक्रारदारांना प्रत्यक्ष उपस्थित करून त्यांच्या समस्यांवर तत्काळ निर्णय घेण्याच्या या पद्धतीमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. अनेक अर्जदारांनी आपल्या तक्रारींचे त्वरित निराकरण झाल्याबद्दल ठाणे शहर पोलीसांचे आभार मानले. नागरिकाभिमुख पोलीसिंगचा भाग म्हणून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होण्यास मदत झाली असून, प्रलंबित तक्रारींच्या निवारणाला गती मिळाल्याचे दिसून आले.




पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,३० जुन २०२६ ते ०६ जुलै २०२६

घारापुरी एलिफंटाच्या नव्या उत्खननात सापडल्या 'या' गोष्टी, ज्यामुळे उलगडली इतिहासातली अनेक रहस्यं



'गेट वे ऑफ इंडिया'हून निघून घारापुरीच्या जेट्टीवर पोहोचल्यावर अरुंद रस्ता जुन्या दगडी पायऱ्यांपाशी जाऊन पोहोचतो. या पायऱ्या इथल्या जगप्रसिद्ध लेण्यांकडे तुम्हाला नेतात. पण आम्ही त्या पायऱ्यांची दिशा बदलत नाही. इथं जवळपास गेल्या सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ वास्तव्यालाच असलेला पुरातत्त्व अभ्यासक चैतन्य डुबे, जो आम्हाला घ्यायला आला आहे, तो सांगतो माज्यामागे डाव्या दिशेला या. 2025 च्या नोव्हेंबर महिन्यापासून इथे असलेल्या चैतन्य आणि त्याच्या टीममधल्या उरलेल्या सगळ्यांचा आता 2026 जून महिन्यात वास्तव्याचा शेवटचा दिवस आहे. त्याच दिवशी आम्ही तिथं गेलो आहोत. हे सगळे लोक एवढा काळ या मुंबईला लागून असलेल्या बेटावर करत काय होते? ते पाहण्यासाठी चैतन्यच्या मागं जावं लागेल. एका बाजूला डोंगरझाडी आणि एका हाताला समुद्र असं ठेवून पायवाटेनं आम्ही पुढे जातो. या बेटाचे तीन भाग मानले जातात. मोराबंदर, सेतबंदर आणि राजबंदर. ज्या भागाकडे आम्ही चाललो आहे तो मोराबंदर. दहाएक मिनिटं चालल्यावर पायवाट सोडून आम्ही डोंगराकडच्या झाडीत शिरतो. थोडी पावलं पुढे गेल्यावर जमिनीचा एखादा मोजून मापून स्लाईस काढावा असा खड्डा दिसतो. हेच पाहायला आम्ही आलो आहे. मुंबईपासून अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात वसलेलं घारापुरीचं बेट. ब्रिटिशकाळात इथे झालेल्या उत्खननानंतर, लेण्यांचं अस्तित्व प्रकाशात आल्यानंतर, याला 'एलिफंटा' या नावानंही बहुतांशी ओळखलं जातं.

'युनेस्को'नं जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या या बेटाची ओळख आजवर प्रामुख्याने त्याच्या अद्भुत लेण्यांमुळे होती. पण गेल्या आठ महिन्यांत या बेटावर झालेल्या उत्खननातून एक नवं सत्य समोर आलं आहे. घारापुरी हा केवळ कलात्मक आणि सांस्कृतिक वारसाच नव्हे, तर दीड हजार वर्षांपूर्वीचं एक भरभराटीचं आंतरराष्ट्रीय व्यापारी बंदर होतं. घारापुरीचं नव्यानं उत्खनन 2025 च्या वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून 'आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' आणि पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रसिद्ध असलेलं पुण्याचं डेक्कन कॉलेज यांनी संयुक्तपणे घारापुरीच्या बेटावर उत्खनन सुरू केलं. यंदाच्या जून महिन्यापर्यंत ते चाललं. अरकतर्फे मुंबई विभागाचे अभिजीत आंबेकर यांची टीम, डेक्कन कॉलेजतर्फे इथले सहयोगी प्राध्यापक अभिजित दांडेकर यांची टीम आणि सोबत पुरातत्त्वशास्त्राचे अनेक अभ्यासक आणि विद्यार्थी या उत्खनन मोहिमेत सहभागी झाले होते. घारापुरी बेटावरील मोराबंदर या भागात या मोहिमेत उत्खनन झालं. आणि हे उत्खनन अनेक नव्या शोधांचं निमित्त ठरलं. या उत्खननातून हाती आलेले पुरावे इतके महत्त्वपूर्ण आहेत की घारापुरीच्या बेटाचा इतिहास थेट तिसऱ्या शतकापर्यंत मागे गेला आहे.

साधारण 6 व्या ते 8 व्या शतकात घारापुरीच्या लेण्या कोरल्या गेल्या असाव्यात असा संशोधकांचा अंदाज आहे. या लेण्यांच्या अभ्यासातून संशोधकांना आधीपासूनच वाटत होतं की या बेटावर आणखी ऐतिहासिक वारसा दडलेला आहे. मात्र त्यापूर्वीचा नक्की इतिहास काय होता, हा प्रश्न अनुत्तरित होता. काही वर्षांपूर्वी असा समज होता की बदामीचे चालुक्य राजे किंवा मध्य प्रदेशातील कलचुरी राजे यांच्याशी या लेण्यांचा संबंध आहे. कृष्णराज कलचुरी नावाच्या राजाची नाणी या बेटावर सापडली होती त्यामुळे हे कलचुरी काळातलं असावं असा कयास होता. पण लेण्या नक्की कोणत्या काळात खोदल्या गेल्या, आणि एका बेटावर अचानक लेण्या का आल्या, हा मूळ प्रश्न होताच. त्यामुळे यापूर्वी इथे काहीतरी वस्ती असणं आवश्यक होतं, असं डेक्कन कॉलेजचे सहयोगी प्राध्यापक अभिजीत दांडेकर सांगतात. 6 व्या ते 8 व्या शतकात घारापुरीच्या लेण्या कोरल्या गेल्या असाव्यात असा संशोधकांचा अंदाज आहे. 6 व्या ते 8 व्या शतकात घारापुरीच्या लेण्या कोरल्या गेल्या असाव्यात असा संशोधकांचा अंदाज आहे. अभ्यासकांचा एक कयास हाही होता की जिथे एवढ्या कलाकुसरीच्या, भव्यतेच्या लेण्या आणि खोदकाम आहे, या कामासाठी मोठी रसदही आवश्यक असते. अनेक वर्षं, कधीकधी अनेक शतकं असं काम सुरू असतं. त्यामुळे तिथे किंवा जवळ भरभराटीला आलेलं शहर, व्यापारकेंद्र, अथवा वस्ती असणारच. त्यामुळे घारापुरीजवळ उत्खनन केलं तर काही नवीन हाती गवसेल असं पुरातत्त्व अभ्यासकांना वाटत होतं. आणि तसंच झालं. दांडेकर पुढे सांगतात, साधारण 4 थ्या शतकाच्या सुरुवातीपासून ते 12 व्या शतकापर्यंतच्या वस्तू इथे सापडल्या आहेत. म्हणजे 700 ते 800 वर्षं हे बंदर अस्तित्वात होतं असं आत्मविश्वासाने सांगता येतं. जितक्या प्रमाणात आपल्याला टॉरपीडो जार्स (मातीची उंच मोठी भांडी) आणि इतर गोष्टी मिळाल्या आहेत, त्यावरून हे भारतातील सर्वाधिक उत्खनित स्थळांपैकी एक असावं असा अंदाज आहे. जेवढं उत्खनन इथं झालं आहे, अचंबित करणारं आहे. त्यातली सगळ्यात आकर्षक जागा, म्हणजे पाणवठा. चैतन्य आणि त्याच्या काही सहकाऱ्यांसोबत आम्ही मोराबंदर परिसरात फिरतो. एकूण 19 ठिकाणी उत्खनन झालं आहे. म्हणजे तेवढ्या ट्रेन्चेस, खड्डे इथं आहेत. वर जमिनीवर जे पुरावे आढळले, त्यांचा अंदाज घेऊन नेमक्या ठिकाणी खोदकाम करावं असं ठरतं. ते मोठं जिकिरीचं काम असतं कारण आत खाली दबलेल्या वस्तू हा मोठा पुरातत्त्वशास्त्रीय पुरावा असू शकतो. त्याचा अंदाज घेत हे ट्रेन्चेस केले गेलेत.

पण पहिली छोटी टेकडी चढून थोडं वर गेलं आहे की या मोहिमेत मिळालेला सगळ्यात मोठा पुरावा. एक आखीव-रेखीव, घडवलेला, अनेक पायऱ्यांचा खोल पाणवठा. जरा अतिशयोक्ती वाटू शकेल पण केवळ फोटोंमध्ये पाहिलेल्या मोहेंजोदाडोच्या 'ग्रेट बाथ'ची किंवा आपल्याकडे ज्यांना बारव म्हणतात अशा खोल असलेल्या पण कलाकुसरीनं घडवलेल्या मोठ्या पायऱ्यांच्या इतिहासकालीन बारवांची आठवण या पाणवठ्याकडे पहिल्यांदा पाहिल्यावर येते. एक आखीव-रेखीव, घडवलेला, अनेक पायऱ्यांचा खोल पाणवठा. टेकडीच्या उतारावर घडवला गेलेला हा पाणवठा. आयताकृती दगडांच्या घडवलेल्या पायऱ्या आणि विटांच्या भिंती. उतारावर पाणी अडवून इथं साठवलं जात असणार. समुद्राच्या खाऱ्या पाण्यानं वेढलेल्या बेटावर गोड्या पाण्याचा हा अत्यावश्यक साठा होता. संशोधक चैतन्य डुबे याबद्दल सांगतो, नीट पाहिलं तर समजतं की ज्या दगडांनी आणि विटांनी ही स्टेपवेल अथवा पाणवठा बनलेला आहे, ते दगड या बेटावरचे नाहीत. हा दगड इथे मिळत नाहीत. विटाही इथे भाजण्याचं काही कारण नाही कारण इथे तेवढी माती नाही. त्यामुळे आमचं म्हणणं आहे की हे सर्व बाहेरून मागवलेलं आहे. याचाच अर्थ व्यापार इतका मोठा होता की या बेटावर येणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी आणि प्रवाशांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करून हा जलाशय उभारला गेला. आम्ही नाणी आणि पुरातन वस्तूंच्या आधारे याचं वय सुमारे 1500 वर्षं असल्याचा सध्याचा अंदाज आहे. टेकडीच्या उतारावर घडवला गेलेला हा पाणवठा. चैतन्य हेही सांगतो की आता जेवढा या पाणवठ्याचा जेवढा भाग प्रकाशात आला आहे अथवा जेवढ्याचं उत्खनन झालं आहे, तेवढाच याचा पसारा नसावा. अजूनही याचा बराच भाग अजूनही जमिनीखाली आहे. भविष्यातल्या उत्खननात तो शोधला जाऊ शकतो. पण ज्याअर्थी इथं एवढा मोठा पाणवठा बांधला गेला, त्याअर्थी मोठी वर्दळ आणि वस्ती होती. मातीची भांडीः आंतरराष्ट्रीय संबंधांचं प्रमाण जवळपास आठ महिने चाललेलं हे उत्खनन आता थांबलं आहे. म्हणजे या मोहिमेचा एक टप्पा आता पूर्ण झाला आहे. आता यात जे पुरावे सापडले त्याचा अभ्यास होईल आणि त्यातून आलेल्या निष्कर्षांतून जसं आवश्यक असेल तसं पुढचं उत्खनन होईल. हे पुरावे म्हणजे केवळ वर उल्लेख केलेल्या पाणवठ्यासारख्या बांधकामाचेच नाहीत. तर इतरही अनेक प्रकारचे आहे.

त्यातला एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे इथे उत्खननात मिळालेली विविध प्रकारची आणि विविध देशींची भांडी. विविध देशांतून आलेली मातीची भांडी. उत्खननात रोजच्या वापराची लाल आणि राखाडी भांडी तर सापडलीच, इराणसारख्या प्रदेशांमधून आलेली भांडीही मिळाली आहेत. इथे बऱ्याच वेगवेगळ्या प्रकारची पॉटरी आम्हाला मिळाली, दांडेकर आम्हाला एकेक भांड दाखवत सांगतात. इथे बऱ्याच वेगवेगळ्या प्रकारची पॉटरी आम्हाला मिळाली,दांडेकर आम्हाला एकेक भांडे दाखवत सांगतात. त्यात रोजच्या वापरातली जी भांडी असतात ती तर मिळालीच. पण आता आम्ही जेव्हा म्हणतो की एलिफंटा हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचं एक केंद्र होतं तर त्याचा पुरावा काय? तर ते परत आपल्याला मातीच्या भांड्यातून सांगता येतं. उदाहरणार्थ, जी पश्चिम आशियामधून भांडी यायची किंवा आखाती प्रदेशातून भांडी आली किंवा इराणमधून भांडी आलेली आहे ती भांडी याच्यातून आपल्याला दिसतं की आपले इराणशी म्हणा किंवा आखाती देशांशी चांगले व्यापारी संबंध होते,दांडेकर सांगतात. आता या भांड्याच्या निरीक्षणातून ते कोणत्या देशातून आलं आहे हे कसं सांगता येतं हे दाखवण्यासाठी एका तुटून अर्ध्या राहिलेल्या मातीच्या भांड्याचा उरलेला भाग ते हातात घेतात. हे भांडे निमुळतं असून त्याला खाली एक खूर असल्यासारखा भाग आहे. हा एक भांड्याचा तुकडा आपला जो दिसतो तो एका भांड्याचा बूड आहे. हा जो खूर आहे, याच्यावरून आपल्याला सांगता येऊ शकतं की हे भांडं आखाती प्रदेशातलं तर आहेच. कारण अशी भांडी त्या भागात मिळाली आहेत. हे दुसरं भांडं जर आपण बघितलं तर त्याचा खूर जरा उंच दिसतो. त्यामुळे आपल्याला असं सांगता येऊ शकतं की जरी आखाती प्रदेशातून आले असतील तरी आखाती प्रदेशातल्या वेगवेगळ्या भागातून ही भांडी आलेली आहेत ती कदाचित ओमानमधून आली असतील किंवा उत्तर आफ्रिकेतूनही आलेलं असू शकतं,अभिजीत पुढे सांगतात. हे भांड निमुळतं असून त्याला खाली एक खूर असल्यासारखा भाग आहे.फोटो स्त्रोत,ठकळ्कठ ठअत्रक्षअफ्हअफ्/इइउ

फोटो कॅप्शन,हे भांड निमुळतं असून त्याला खाली एक खूर असल्यासारखा एवढी मोठी साठवणुकीची भांडी इथं मिळाली आहेत. एका मोठ्या वडाच्या झाडाखाली एक सापडलं. त्या झाडाची मुळंही भांड्यात घुसली होती. त्या मुळांतून ते भांड सोडवलं गेलं आणि त्याचे झालेले तुकडे एकेक करुन गोळा केले गेले.

हे मोठं किचकट काम एएसआयचे सिनियर मॉडेलर सुधीर वाघ करतात. या दुसऱ्या भांड्याचे तुकडे जोडून आता अध्यार्पेक्षा जास्त भांडं त्यांनी पुन्हा जसंच्या तसं जोडलं आहे. काम अजूनही चालूच आहे. एखादा माणूस बसू शकेल एवढी मोठी साठवणुकीची भांडी इथं मिळाली आहेत. ज्या स्थितीमध्ये हे मिळालं त्याच स्थितीमध्ये म्हणजे आपण याला गोलाकार करून ठेवण्याचा प्रयत्न करतोय,सुधीर वाघ सांगतात. म्हणजे एक चांगल्या प्रकारे याला आपल्याला उचलून संग्रहालयात ठेवता येईल. अशी दोन मोठी भांडी सापडली. त्याचे परत तुकडे होऊ नयेत म्हणून फायबर ग्लासचं कोटिंगही आम्ही आतून करतो आहे, वाघ पुढे सांगतात. नाण्यांमधून आणि मण्यांमधून उलगडणारा इतिहास जर घारापुरी हे व्यापाराचं केंद्र होतं तर महत्त्वाचा पुरावा ठरतो चलनाचा. म्हणजे नाण्यांचा. भारतातली आणि भारताबाहेरची साम्राज्य त्यांची नाणी पाडायचे. त्यांची देवाणघेवाण व्हायची. अशी जवळपास 70 नाणी घारापुरीच्या उत्खननात सापडली आहेत.अभिजीत दांडेकर ही नाणी आम्हाला पुण्यात दाखवतात. ती आता प्रदेशांनुसार, कालखंडानुसार वेगळी करुन ठेवण्यात आलेली आहे. अनेक वर्षं मातीत दबून राहिल्यानं, क्षारयुक्त हवा असल्यानं ती नाणी गंजली आहेत. त्यावर अनेकविध थर आहेत. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीनं ती स्वच्छ करुन मग वाचावी लागतात. काहींवर चिन्हं आहेत, काहींवर लिपीमध्ये काही लिहिलेलं. जवळपास 70 नाणी घारापुरीच्या उत्खननात सापडली आहेत.

यातलं एक चांदीचं नाणं उचलून अभिजीत दांडेकर आम्हाला दाखवतात. हे कार्दमक क्षत्रप घराण्याचं नाणं असून या नाण्यांवर राजाचा चेहरा, त्याचं नाव, त्याच्या वडिलांचं नाव आणि त्यांचे हुद्दे कोरलेले असतात असं ते सांगतात.

हे साधारण तिसऱ्या किंवा चौथ्या शतकातील रुद्रसेन दुसरा या राजाचं नाणं असावं. त्यावरून त्यांची संपूर्ण राजकीय वंशावळ बांधणं शक्य होतं,दांडेकर पुढे सांगतात. जशी भांडी सापडतात तशी भारताबाहेरच्या साम्राज्यांतली अनेक नाणीही इथे सापडली आहेत. इराणमधल्या इराणच्या ससेनिअन राजांचं एक नाणं ते आम्हाला दाखवतात. ते जरा काळं पडलं आहे आणि अजून स्वच्छ व्हायचं आहे. पण त्यावरची चिन्हं बऱ्यापैकी दिसतात.

तिसऱ्या ते सातव्या शतकापर्यंत इराणमध्ये राज्य करणाऱ्या या राजांच्या नाण्यावर राजाचं चित्र आणि झरतुष्ट्री (झोरोस्ट्रियन) धमार्चा पवित्र अग्नी कोरलेला आहे. यजदेगर्द तिसरा हा शेवटचा ससेनिअन राजा. त्यानंतरच पारसी लोक भारतात आले. या राजांचं नाणं घारापुरीत सापडणं म्हणजे इराणशी थेट व्यापारी संबंध असल्याचा पुरावा आहे, असं निरीक्षण दांडेकर नोंदवतात.

इथं सापडलेल्या नाण्यांवरून सांगता येतं की किमान दोन राजघराणी होती त्यांचा ह्या बेटाशी गहिरा संबंध असावा. त्यातले एक म्हणजे त्रिकुटक राजे. यांची नाणी आपल्याला इथे सापडली आहेत. आणि दुसरे कलचुरी राजे. कलचुरी राजे हे हे मूळचे मध्य प्रदेश मधले राजे. मध्य प्रदेश मधल्या महिष्मतीचे ते राजे. त्यात एक कृष्णराज नावाचा एक मोठा राजा होऊन गेला. त्या कृष्णराजाची बरीचशी तांब्याची नाणी आपल्याला इथे सापडलेली आहेत, दांडेकर सांगतात. नाण्यांसोबत अजून एक महत्वाचा पुरावा म्हणजे मणी. ते एकतर मातीचे भाजून बनवलेले (टेराकोटा) असतात अथवा रंगीबेरंगी दगडांचे असतात. उत्खननात तेही बरेच सापडले. खोदलेली माती गाळून मोठ्या कष्टानं हे मणी हुडकावे लागतात. मग स्वच्छ करुन त्यांचा अभ्यास करावा लागतो. डेक्कन कॉलेजच्या संशोधक केतकी महाजन सांगतात की सापडलेल्या काही मण्यांचं उत्पत्तिस्थान सीरिया असावं असं दिसतं. हे काचेचे मणी लेट रोमन काळातले आहेत, साधारण सातव्या शतकानंतर हे सापडतात.मणी एकतर मातीचे भाजून बनवलेले (टेराकोटा) असतात अथवा रंगीबेरंगी दगडांचे असतात. रुपाली सिंग यांनी नेफ्राईट दगडाच्या मणी दाखवतात आणि सांगतात हा भारतात मिळत नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. ववि‌शम /कर/७२७/२०२६-२७

दिनांक - ३०/०६/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	NL02/944/12	ASS/36902	राहुलकुमार आर. वैश्य	शिवकुमार रामलाल गुप्ता
2	NL01/251/69	ASS/36937	सानवी सिध्देश मांडवकर / सिध्देश अनंत मांडवकर	रोहन सुरेश चव्हाण hiral रोहन चव्हाण
3	NL02/366/92	ASS/36935	अर्चना भोसले	रिया प्रणाल कोटकर / प्रणाल प्रकाश कोटकर
4	NL03/83/11	ASS/36934	पन्डोई रामदेव यादव	राजेश कुमार यादव
5	NL03/1135/6	ASS/36961	सरस्वती शांताराम पवार	एन्थोनी ए. क्रायडो
6	NL02/435/18	ASS/36962	हाजरा बेगम	ओमप्रकाश किशन गुप्ता
7	NL03/1220/21	ASS/36946	गोविंद भिकु महाडीक	सरिता सदानंद गुरव / सदानंद नारायण गुरव
8	NL01/148/5	ASS/36936	रेखाबेन सुरेशभाई चौहान	सागर सुरेश चौहान
9	NL01/253/76	ASS/36932	वर्सटाईल प्रा.लि.	अवकाश मिश्रा / पूजा देवी
10	NL02/703/29	ASS/36925	प्रवीणा खातून नैयर आलम	उबैदुर्रहमान अब्दुल रज्जाक
11	NL04/79/2	ASS/36983	राजेश गंगाराम उतेकर	हनीफ जनुल्लाह शेख
12	NL03/71/11	ASS/36907	विरेंद्र चंद्रकांत करंबेळे	भूषण शांताराम सांडीम
13	NL01/155/10	ASS/36900	विदिशा दिपक सावर्डेकर	वैभव नवसाजी परब
14	NL03/954/16	ASS/36898	महेश कानाल	सविता महेश कानाल
15	NL01/159/2	ASS/36951	राजेश पांडुरंग नामये / गीता रा. नामये	सुनिल भिकाभाई डांगिया / मिना सुनिल डांगिया
16	NL07/517/5	ASS/36986	भावना शैलेश गुजराती	अशोक लेन्सी पिंटो
17	NL07/549/19	ASS/36987	हिरामन शेठ जाधव	अनिकेत सुनिल गुडधे / सुनिल रामचंद्र गुडधे
18	NL07/542/51	ASS/36953	साई आर्ची डेव्हलवर्स	कुमार पांडुरंग पार्टे
19	NL03/987/3	ASS/34543	ताहर रामआसरे पाल	कुसुमदेवी हनुमान मौर्या
20	NL02/159/43	ASS/32417	प्रेमसिंह शेरसिंह भिलौला	धनादेवी S/O प्रेमसिंह भोलौला

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,३० जुन २०२६ ते ०६ जुलै २०२६

संपादकीय

ईडीने दिली टाळी, आता केरळची पाळी!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

सध्याची परिस्थिती अशी आहे की केरळमध्ये काँग्रेस सत्तेत आहे, एलडीएफ विरोधात आहे आणि भाजप अद्याप सत्तेपासून दूर आहे. परंतु २०२६ च्या निवडणुकीत भाजपने काही जागांवर वाढ केली असेल. पुढील निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा २०३१ विधानसभा त्यासाठी आत्ताच जमीन तयार होत आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की केरळमध्ये काँग्रेस सत्तेत आहे, एलडीएफ विरोधात आहे आणि भाजप अद्याप सत्तेपासून दूर आहे. परंतु २०२६ च्या निवडणुकीत भाजपने काही जागांवर वाढ केली असेल. पुढील निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा २०३१ विधानसभा त्यासाठी आत्ताच जमीन तयार होत आहे. केरळचे माजी मुख्यमंत्री पी. पिनराई विजयन यांची मुलगी वीणा विजयन ईडीच्या चौकशीत आहे. वीणा विजयन यांना कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) प्रकरणात मनी लॉन्डरिंग (पीएमएलए) चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. त्यांची आयटी कंपनी एक्सलॉजिक सोलुशन्सला सीएमआरएल कडून सुमारे दोन कोटीच्या संशयास्पद पेमेंट्सचा तपास सुरू आहे. १७ जून २०२६ रोजी कोचीतील ईडी कार्यालयात त्या हजर झाल्या आणि जवळपास १० तास चौकशी झाली. पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. हे प्रकरण केरळ राजकारणात मोठी खळबळ उडवणारे आहे. ईडीचा दावा आहे की हे पेमेंट्स संशयास्पद व्यवहारांशी संबंधित आहेत. वीणा यांनी यापूर्वीही समन्स प्राप्त केले होते. केरळचे राजकारण, भाजपची राष्ट्रीय रणनीती, आणि गेल्या एक दशकात ईडीचा राजकीय हत्यार म्हणून कसा वापर झाला, हे आठवलं तर ईडीने दिली टाळी आता केरळची पाळी हेच घडेल असं वाटतंय. २७ मे २०२६. पहाटेच्या अंधारात केरळच्या राजधानी तिरुवनंतपुरममध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) गाड्या एकाच वेळी अनेक दिशांनी निघाल्या. माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचे निवासस्थान, त्यांच्या मुलीचे घर, जावयाचे निवासस्थान सगळीकडे एकाच वेळी धाडी. केरळच्या राजकीय इतिहासात असे कधी घडले नव्हते. काही वेळातच रस्त्यावर सीपीआय (एम) चे हजारो कार्यकर्ते उतरले, ईडीच्या गाड्यांवर दगडफेक झाली, काचा फुटल्या. अजय देवगण यांच्या 'रेड' सिनेमासारखे दृश्य चक्क प्रत्यक्षात केरळ मध्ये दिसत होतं. आपल्या नेत्याची निवडणुकीत पार विल्हेवाट लागलेली असताना आता हे ईडी काय भानगड हेच कार्यकर्त्यांना कळे ना! कार्यकर्त्यांनी गाडी फोडून, त्या ईडीच्या अधिकाऱ्यांची पळता भुई थोडी केली खरी पण या हिंसाचारापलीकडे पाहता एक प्रश्न मनात आला. हे केवळ एका भ्रष्टाचाराच्या तपासाचे छापे होते की भारतीय जनता पक्षाच्या केरळ जिंकण्याच्या दीर्घकालीन रणनीतीचा एक महत्त्वाचा टप्पा? कारण महाराष्ट्रापासून मध्यप्रदेश पर्यंत आणि गोव्या पासून आसाम पर्यंत असंच काहीसं घडत आलंय आणि वर्षे दोन वर्षात सत्ता पालट झालंय. ईडीची कारवाई कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) आणि एक्सलॉजिक सोलुशन्स या कंपन्यांशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात आहे. आरोप असा की सीएमआरएल या खनिज उत्खनन कंपनीने (ज्यात केरळ सरकारचाही १३.४% हिस्सा आहे) विजयन यांची मुलगी टी. वीणा हिच्या एक्सलॉजिक सोलुशन्स या आयटी कंपनीला २०१७ ते २०२१ दरम्यान सुमारे १.७ कोटी दिले. परंतु कोणतीही सेवा न घेता. म्हणजे हे बनावट व्यवहार होते, असा ईडीचा दावा आहे. एप्रिल २०२५ मध्ये सिरीयस फ्रॉड इन्वेस्टीगेशन ऑफिस (एसएफआयओ) ने वीणा विजयन आणि २६ जणांविरुद्ध कॉर्पोरेट फ्रॉड चार्जशीट दाखल केली. त्यानंतर सीएमआरएलने ईडी तपास रद्द करण्यासाठी केरळ हायकोर्टात याचिका दाखल केली. परंतु २६ मे २०२६ रोजी हायकोर्टाने ती याचिका फेटाळली आणि अवघ्या एका दिवसात, म्हणजे २७ मे रोजी, ईडीने एकाच वेळी १२ ठिकाणी धाडी घालून १८.३६ कोटी जमा असलेली २४२ बँक खाती गोठवली, डिजिटल पुरावे जप्त केले आणि वीणा यांचा फोन ताब्यात घेतला. हायकोर्टाचा निर्णय आणि धाडींमधील हे अवघ्या एका दिवसाचं अंतर निव्वळ योगायोग आहे, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. केरळ भारतातील एकमेव राज्य होते जिथे गेल्या पाच दशकांपासून डावे पक्ष सत्तेत यायचे. हिंदू बहुसंख्य असलेल्या या राज्यात उजव्या विचारसरणीला कधीच मोठे यश मिळाले नव्हते. १४० जागांच्या विधानसभेत भाजपला एकही जागा नव्हती, किंवा कधी एखादी जागा मिळाली तरी ती टिकवता आली नाही. २०२६ च्या निवडणुकीत भाजपने ख्रिश्चन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. सायरो-मलाबार बेल्ट मधील मतदारसंघांमध्ये ख्रिश्चन उमेदवार उभे केले. परंतु कंजिराप्पाली, पूनजर, पाला, थ्रिव्हल्ला या सर्व महत्त्वाच्या जागांवर पराभव झाला. अखेरीस निकाल असा लागला की काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युडीएफने १०२ जागा जिंकल्या, एलडीएफ ला केवळ ३५ जागा मिळाल्या ज्यात सीपीआय (एम) चे फक्त २६ आमदार निवडून आले. विजयन यांच्या २१ सदस्यांच्या आणि मंत्रिमंडळातील तब्बल १३ मंत्र्यांचा दणकून पराभव झाला. या निकालात भाजपचा स्वतःचा फारसा उदय झाला नाही. काँग्रेस सत्तेत आली, एलडीएफ विरोधात बसली. मग भाजपला या क्षणी विजयन यांच्यावर धाड का घालायची होती? कारण हे केवळ आजचे राजकारण नाही, हे २०३१ साठीची जमीन तयार करण्याचे काम आहे. भाजपा सत्तेत आल्यापासून गेल्या बारा वर्षात सर्वाधिक वेळा आपल्या विरोधकांना ताब्यात आणण्यासाठी भाजपाने सरकारी यंत्रणांचा वापर केला आहे. त्यामुळे सीबीआय आय टी आणि ईडी ह्या आता राजकीय हत्यार म्हणून वापरल्या जातात का हा प्रश्न आता केवळ विरोधकांचा आरोप राहिलेला नाही. तर त्याचे पुरावेही समोर आहेत. मार्च २०२३ मध्ये १४ विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यातील आकडेवारी धक्कादायक होती. २०१४ पासून ईडीने १२१ राजकीय नेत्यांचे तपास केले, त्यापैकी ११५ म्हणजे तब्बल ९५% विरोधी पक्षांचे होते. या याचिकेत आणखी एक महत्त्वाचे निरीक्षण होते जे विरोधी नेते नंतर भाजपमध्ये सामील झाले, त्यांच्यावरील तपास मंदावला किंवा थांबला. हे निव्वळ आरोप आहेत असे म्हणणे कठीण आहे, कारण ऐतिहासिक उदाहरणे स्पष्ट आहेत. महाराष्ट्र ही तर याची सर्वात मोठी प्रयोगशाळा म्हणावी लागेल. उदाहरण द्यायचे झाले तर राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे अगदी स्वर्गीय अजीत पवार हे नेते. साखर कारखाने आणि सहकारी बँकांमधील अनियमिततेबद्दल ईडीने त्यांच्या मालमत्तांवर छापे घातले. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये अजित पवार भाजपच्या एनडीए आघाडीत उपमुख्यमंत्री म्हणून दाखल झाले. छगन भुजबळ यांनी सांगितले की ईडीच्या सततच्या नोटिसांमुळे त्यांना अजित पवारांच्या गटात जाण्याशिवाय पर्याय नव्हता. राष्ट्रवादीच्या ९ बंडखोर आमदारांपैकी ४ जण अजित पवार, प्रफुल्ल पटेल, भुजबळ, हसन मुश्रीफ भाजपसोबत जाण्यापूर्वी ईडीच्या मनी लॉंड्रिंग तपासाखाली होते. एकनाथ शिंदे यांनी स्वतः हे मान्य केले की ईडीच्या भीतीने भाजपकडे येऊ नका हे विधान खुद्द भाजपच्या मित्रपक्षाने केले हे विचार करण्यासारखे आहे. झारखंड मध्ये २०२४ च्या झारखंड निवडणुकीच्या काळात ईडीने मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निकटवर्तीवर धाड घातली. मतदानाच्या आदल्या दिवशी झारखंडमध्ये ईडीच्या कारवाया झाल्या. झारखंड मुक्ती मोर्चा ने हे बांगलादेशी घुसखोरी नॅरेटिव्ह रुजवण्यासाठी भाजपचा डाव असल्याचा आरोप केला. त्या निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा परत सत्तेत आले, हा भाग वेगळा परंतु कारवाईचा पॅटर्न तोच होता. आसाम, बंगाल, दिल्ली या राज्यांमध्येही निवडणुकांच्या तोंडावर किंवा विरोधी नेत्यांना कमकुवत करण्यासाठी ईडी-सीबीआयच्या कारवाया झाल्याचे दिसून आले आहे. दिल्लीत तर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना थेट ईडीने अटक केली होती. मुख्यमंत्री पदावर असलेल्या माणसाला अशी सूड बुद्धीने वागणूक देणारा भाजपा हा एकमेव राजकीय पक्ष असेल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या नेत्यांवर सातत्याने कारवाया होत असतात. त्यामुळे जिथे जिथे विरोधक ताकदवान तिथे तिथे भाजपाने ईडीची कारवाई केली आणि केले बदनाम हेच पाहायला मिळाले आहे. भाजपला केरळ जिंकायचे आहे. परंतु केरळ हे साधे राज्य नाही. इथे हिंदू ५३%, मुसलमान २७% आणि ख्रिश्चन जवळपास २०% आहेत. अल्पसंख्याक समुदायांचे एकगठ्ठा मतदान इथे परंपरेने निर्णायक असते. त्यामुळे भाजपची रणनीती तीन आघाड्यांवर चालते. पहिली आघाडी सीपीआय (एम) ची बदनामी करून त्यांना नामोहरम करणे. विजयन यांच्यावरील ईडी छापे हे केवळ वीणा विजयन प्रकरणापुरते नाहीत. तर सीपीआय (एम) ही भ्रष्ट पार्टी आहे हा संदेश केरळच्या मतदारांपर्यंत पोहोचवायचा आहे. एलडीएफ आधीच २०२६ च्या निवडणुकीत ३५ जागांवर आलेला आहे. आता ईडी छाप्यांमुळे विजयन आणखी बचावात्मक स्थितीत येतील. सीपीआय (एम) जेव्हा राजकीय सूड म्हणतो, तेव्हा मतदार विचार करतील धूर असेल तरच आग असेल. हा मनोवैज्ञानिक परिणाम भाजपला हवा आहे. दुसरी आघाडी काँग्रेसला कमकुवत करणे. केरळमध्ये सध्या काँग्रेस सत्तेत आहे. युडीएफ ला १०२ जागा मिळाल्या आहेत. परंतु युडीएफ मध्ये काँग्रेस, आययुएएल आणि केरळ काँग्रेस आहेत. जर भाजप मुस्लीम मतदार काँग्रेसपासून तोडू शकला, किंवा ख्रिश्चन मतदारांचा काही भाग आपल्याकडे वळवू शकला, तर पुढील निवडणुकीत त्यांना थेट फायदा होऊ शकतो. आणि तिसरी आघाडी हिंदू एकत्रीकरण. केरळमध्ये नायर, एज्हावा, ब्राह्मण अशा अनेक हिंदू जाती आहेत.

२६ जूनला का साजरा केला जातो 'छळाविरुद्धचा आंतरराष्ट्रीय दिवस'?



संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेला 'छळाच्या बळींच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय दिवस' दरवर्षी २६ जून रोजी साजरा केला जातो. जगभरातील छळ आणि अमानवीय वागणुकीच्या बळींच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी जागरूकता निर्माण करणे हा याचा उद्देश आहे. मानवी सभ्यता कितीही प्रगत झाली असली, तरी जगाच्या पाठीवर आजही अनेक ठिकाणी छळ आणि अमानवीय वागणुकीच्या घटना घडताना दिसतात. कोणत्याही व्यक्तीला दिली जाणारी शारीरिक किंवा मानसिक यातना ही केवळ त्याच्या शरीरालाच नव्हे, तर त्याच्या मनाला आणि आत्म्यालाही खोलवर मानसिक आघात पोहोचवते. याच गंभीर समस्येकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी आणि छळाला बळी पडलेल्या निष्पाप लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी दरवर्षी २६ जून रोजी जगभरात छळाच्या बळींच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय दिवस पाळला जातो. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने, सुरक्षिततेने आणि आदराने जगण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. या जागतिक दिनामागे एक अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. २६ जून १९८७ रोजी छळाविरुद्ध आणि इतर क्रूर, अमानुष किंवा अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षेविरुद्धचा संयुक्त राष्ट्रांचा करार अधिकृतपणे अंमलात आला होता. या कराराचा मुख्य हेतू जगभरातून कोणत्याही प्रकारच्या छळवणुकीचे समूळ उच्चाटन करणे हा होता. त्यानंतर, १९९७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अधिकृत ठराव मंजूर करून दरवर्षी २६ जून हा दिवस छळ सहन केलेल्या पीडितांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी समर्पित केला. शारीरिक आणि मानसिक आघातातून पुनर्वसनाची गरज तज्ञांच्या मते, छळाचे स्वरूप केवळ शारीरिक जखमांपुरते मर्यादित नसते. एखाद्या व्यक्तीवर जेव्हा अनन्वित अत्याचार किंवा अन्याय केला जातो, तेव्हा त्याचा त्याच्या मानसिक आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होतो. अनेक पीडित व्यक्तींना पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, नैराश्य आणि तीव्र भीतीचा सामना करावा लागतो. या परिस्थितीमधून त्यांना बाहेर काढणे ही केवळ त्यांच्या कुटुंबाचीच नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असते. छळाच्या बळींना केवळ सहानुभूती नको असते, तर त्यांना हक्काची कायदेशीर मदत, वैद्यकीय उपचार आणि समाजात मानाचे स्थान मिळणे गरजेचे असते.

याच उद्देशाने २६ जून रोजी जगभरातील विविध देशांमध्ये अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले जातात. मानवाधिकार संघटना, स्वयंसेवी संस्था आणि कायदेशीर सल्लागार या दिवशी एकत्र येतात. विविध शहरांमध्ये परिसंवाद, कायदेशीर मदत शिबिरे, चर्चासत्रे आणि मानवाधिकार मोहिमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची जाणीव करून दिली जाते आणि कायद्याचे रक्षण कसे करावे, याचे मार्गदर्शन केले जाते. सन्मानाने जगण्याचा अधिकार आणि जागतिक एकता हा आंतरराष्ट्रीय दिवस आपल्याला एक अतिशय स्पष्ट आणि कठोर संदेश देतो कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही देशात किंवा कोणत्याही कारणासाठी मानवी छळ हा पूर्णपणे अस्वीकार्य आहे. युद्ध, अंतर्गत सुरक्षा किंवा आणीबाणी यांसारख्या कठीण परिस्थितीतही कोणावरही अमानुष अत्याचार करण्याचा अधिकार कोणालाही नाही. २६ जून हा केवळ एक विशेष दिवस नाही, तर ती एक जागतिक चळवळ आहे, जी पीडितांना असा विश्वास देते की ते या लढ्यात एकटे नाहीत. जेव्हा संपूर्ण जग या अमानवीय कृत्याविरुद्ध एकत्र उभे राहते, तेव्हाच एका खऱ्या अर्थाने सुरक्षित आणि संवेदनशील समाजाची निर्मिती होऊ शकते. हैदराबाद : संयुक्त राष्ट्र महासभेने 12 डिसेंबर 1997 रोजी 26 जून हा पीडितांच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून घोषित करण्याचा ठराव संमत केला. जगभरातील राष्ट्रे, नागरी समाज आणि व्यक्तींना छळ झालेल्यांच्या दुःखाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि ज्यांच्यावर अत्याचार होत आहेत. त्यांना पाठिंबा आणि आदर दर्शविण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. दिवसाची उद्दिष्टे काय आहेत ? युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल डे ऑफ सपोर्ट ऑफ विक्टिम्स ऑफ टॉर्चर हा छळाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि पीडितांना आवश्यक असलेले समर्थन मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचा दिवस आहे. या दिवसाचा उद्देश अत्याचार, इतर क्रूर, अमानवी किंवा अपमानास्पद वागणूक काढून टाकणे आणि पीडितांना समर्थन देणे आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन देणे हा आहे. यातना पीडितांना सावरणे : यातना हे मानवी हक्कांचे उल्लंघन आहे ज्यामुळे अत्यंत वेदना आणि दुःख होऊ शकते. हे सहसा लोकांना धमकावण्यासाठी किंवा शिक्षा करण्यासाठी वापरले जाते. दीर्घकालीन शारीरिक आणि मानसिक समस्यांना कारणीभूत ठरू शकते. या दिवसाचे उद्दिष्ट यातना पीडितांना सावरण्यासाठी आवश्यक असलेली मदत मिळवून देणे आणि अत्याचार सहन न करणारा समाज निर्माण करणे हा आहे. अत्याचार पीडितांच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय दिवसाचा इतिहास : 12 डिसेंबर 1997 रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने 26 जून हा अत्याचार पीडितांच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून घोषित करणारा ठराव मंजूर केला. 26 जून 1998 रोजी, छळाच्या बळींच्या समर्थनार्थ पहिला आंतरराष्ट्रीय दिवस, संयुक्त राष्ट्रांनी सर्व सरकारे, भागधारक आणि जागतिक समाजाच्या सदस्यांना या कायद्याच्या विरोधात उभे राहण्याचे आणि अत्याचार करणाऱ्यांना समर्थन देण्याचे आवाहन केले. त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितले.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)
मुख्य कार्यालय विरार
दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./९१६/२५-२६
दिनांक :- २९/०६/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	सोपारा-२	NL३२/३०५/४	३४६६८	आदिल इस्माईल चिंदे	रानी रशिद शेख/दीना आरीफ काझी
२	समेळ-२	NL०९/२६/७	३४८१६	राजश्री हरिश्चंद्र कांबळी	निकेत अंकुश कासारे/आशा अंकुश कासारे
३	सोपारा-२	NL३२/३५१/९	३४६७१	ग्यासुद्दीन कमरुद्दीन शेख	नूर बानो गयासुद्दीन शेख
४	सोपारा-२	NL३२/५२५/२४	३४७२७	वैभवी म. पाटकर	उज्वला भावेश कणेरी/भावेश लवू कणेरी
५	सोपारा-२	NL३२/६१५/५२	३४७२८	गौतम उध्दव लिहितकर	जहारा जावेंद्र शेख
६	समेळ-२	NL०९/३१/३०	३४७३०	मंगेश बापू शिंदे	प्रथमेश रोहीदास गुजर
७	सोपारा-२	NL३२/४७३/१	३४७१०	दत्तप्रसाद को. ऑ.	हमीदुन्निसा मोहम्मद इसा खान
८	सोपारा-२	NL३२/४७३/२	३४७२३	दत्तप्रसाद को. ऑ.	हमीदुन्निसा मोहम्मद इसा खान
९	समेळ-२	NL०९/१७/१३	३४९३२	करमचंद राघवजी डेढीया	मीना अभय गोसर
१०	समेळ-२	NL०९/१३०/७	३४९५२	संदीप शंकर कैतुरा व सुस्मिता कैतुरा	राजेंद्र मल्लू शिंदे व सुवर्णा राजेंद्र शिंदे
११	समेळ-१	NL०८/१२९/१२	३४९५०	बाळाजी ग. हरम	अविनाश सोनू बावकर व अरोही अविनाश बावकर
१२	समेळ-१	NL०८/९९/३७	३४९४३	महम्मद कासिम महम्मद मियाँ अन्सारी	मोहम्मद असलम खान व सलीमा असलम खान
१३	समेळ-१	NL०८/२४४/५३	३४९४४	सम्राट कंन्स्ट्र.	अनिल नारायण शिंदे व अक्षता अनिल शिंदे
१४	सोपारा-२	NL३२/५२६/५२	२९३६९	अनवर इशताक खान	मो. हरिश हुसैन व मैमुदा बेगम दिलावर खान
१५	समेळ-१	NL०८/२५७/३७	२९३७१	कफिया शेख अब्दूल्ला	फरजाना ए. सैय्यद
१६	सोपारा-१	NL३१/१३०/८	२९५६४	सिध्दीविनायक बिल्डर्स ॲन्ड डेव्ह.	मोहम्मद जामा शेख
१७	सोपारा-१	NL३१/१३७/७	२९५६१	सिध्दीविनायक बिल्डर्स ॲन्ड डेव्ह.	मोहम्मद जामा शेख
१८	सोपारा-२	NL३२/४६५/४८	२९५३२	अफसाना रईस शेख	परवेज अहमद
१९	सोपारा-२	NL३२/३/८	२९५२९	मेहरुनिस्सा अब्दूल्लाह झकरीया	मुहम्मद सरोश झकरीया
२०	समेळ-१	NL०८/२७४/७५	३५५४१	इमरान पावसकर	जरीना अजीज पावसकर
२१	गास - ५	GS०५/२९५८	-	नवदुर्गा बिल्डर्स आणि डेव्ह.	आनंद के. लगले व शांताराम पी. बिर्जे

सही
(मेधा वर्तक)
सहायक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,३० जुन २०२६ ते ०६ जुलै २०२६

तुकाराम मुंढेंच्या खांद्यावर बंदूक, महिलेने केली लाखोंची वसूली, एक चूक नडली अन खेळ खल्लास


FDA अधिकारी बनली पण एक चूक नडली

भिवंडी। सध्या अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांचा धसका अनेकांनी घेतली आहे. त्यांनी एफडीए मार्फत अनेक ठिकाणी धाडी टाकल्या आहे. त्यामुळे भेसळ करणारे, बनावट अन्न बनवणारे, खाद्य पदार्थांच्या ठिकाणी अस्वच्छता ठेवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. ही सकारात्मक बाब असताना याचाच गैर फायदा ही काही जण घेत आहेत. तसाच एक हादरवून टाकणारा प्रकार भिवंडीत समोर आला आहे. एक महिलेने आपण एफडीएचे अधिकारी असल्याचे भासवलं. तिच्या सोबत तिची टोळी ही कार्यरत होती. पण तिचे हे सोंग एका चुकीमुळे सर्वांसमोर उघड झाले. भिवंडीतल्या सतर्क नागरिकांनी तिचा डाव उधळून लावला आहे. तोतया महिला आणि तिची टोळी भिवंडीत कार्यरत होती. गेल्या पंधरा दिवसापासून तिने शांतीनगर हॉटेल, घाऊक विक्रेते यांना आपले लक्ष बनवले होते. शिवाय कारवाईच्या नावाखाली त्यांच्या कडून पैसे उकळण्यास सुरूवात केली होती. मात्र भिवंडीतील्या सतर्क नागरिकांमुळे तिचा डाव उधळला गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शांतीनगर सागर प्लाझा हॉटेल परिसरातील एका घाऊक दुकानात तीन महिला व एक पुरुष आले. त्यांनी आपण एफडीएचे अधिकारी असल्याचे सांगितले. शिवाय तुम्ही शिळे आणि घाणेरडे अन्न पदार्थ विक्री करत आहात असं त्यांना सांगितलं. ते एवढ्यावरच थांबले नाहीत. या तोतयांनी सांगितले की मुदतबाह्य साहित्याची तुम्ही विक्री करत आहात. हॉटेल चालकाला या गोष्टी सांगून त्यांनी धमकावले. त्यानंतर त्यांच्याकडून पैशांची मागणी केली. तो पाच हजार देण्यास ही तयार झाला होता. पण तिथे सतर्क नागरिक होते. त्यांनी त्यांचा हा डाव उधळून लावला. ही माहिती पोलिसांना दिली. हे पाहाता तिच्या सोबतचे साथिदार तिथून पळून गेली. ही महीला मात्र तिथे अडकली. ती तिथल्या लोकांना धमकावत होती. तुम्हाला पोलिसांकडे नेते. तुमच्यावर केस टाकले. तुम्हाला आत टाकते अशी ती धमकावत होती. त्याचा व्हिडीओ ही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यानंतर शांताबाई दशरथ राजपूत या महिलेस ताब्यात घेण्यात आलं. तिच्या विरोधात समशाद खान व जावेद मोहम्मद चौधरी यांनी तक्रार केली होती. शिवाय या महिलेने आपल्याला फसवलं असल्याचं ही त्यांनी तक्रारीत म्हटलं होतं. त्यांनी गेल्या पंधरा दिवसात अनेक दुकानदारांना गंडा घातला आहे. या गुन्हावरून शांताबाई दशरथ राजपूत व तिच्या तीन साथीदारां विरोधात खंडणी व तोतया अधिकारी बनून धमकावणे या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. महिलेला अटक करण्यात आली असून चार दिवसांची पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे. शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी ही माहिती दिली आहे.

नीट परीक्षार्थी विद्यार्थिनीला अंबरनाथ पोलिसांची तात्काळ मदत



NEET परीक्षार्थी आलिशा हिच्याकडे फोटो व पैसे नसल्याने प्रवेशात अडचण निर्माण झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शब्बीर सय्यद व सहायक पोलीस निरीक्षक श्री.पानसरे यांनी तात्काळ मदत करून फोटोची व्यवस्था केली व तिला वेळेत परीक्षा केंद्रात पोहोचवले. विद्यार्थिनीची अडचण लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शब्बीर सय्यद व सहायक पोलीस निरीक्षक श्री. पानसरे यांनी तत्परता दाखवत तिला आर्थिक मदत केली.

अंबरनाथ। रविवारी ऑर्डनन्स येथील केंद्रीय विद्यालय येथे NEET परीक्षेच्या बंदोबस्तादरम्यान, परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थिनी आलिशा हिच्याकडे आवश्यक फोटो नसल्यामुळे तिला परीक्षा केंद्रात प्रवेश मिळू शकत नव्हता. तिच्याकडे पैसेही नव्हते आणि कोणतेही नातेवाईक सोबत उपस्थित नव्हते. तसेच अंबरनाथ पोलीस स्टेशनच्या सरकारी वाहनातून महिला पोलीस अंमलदारांसह तिला फोटो स्टुडिओमध्ये नेऊन तात्काळ फोटो काढून दिला. या वेळी केलेल्या त्वरित मदतीमुळे विद्यार्थिनीला वेळेत परीक्षा केंद्रात प्रवेश मिळाला आणि ती NEET परीक्षा देऊ शकली. अंबरनाथ पोलिसांची संवेदनशीलता, तत्परता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी यांचे हे उत्तम उदाहरण आहे.

बुद्धभूमी प्रकरण : आरपीआय 'ए' व भीमशक्ती क्रांतिकारी संघटनेचा जाहीर पाठिंबा



कल्याण । बुद्धभूमी फाउंडेशन च्या नावाने सातबारा व्हावा या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाच्यावतीने ठाणे प्रदेशाध्यक्ष मिलिंद वानखेडे, भीमशक्ती क्रांतिकारी संघटने च्या वतीने अध्यक्ष सुरेश भोईर यांनी पत्रक देऊन जाहीर पाठिंबा दिला कल्याण वालधुनी येथील बुद्धभूमी फाउंडेशन 45 वर्ष वापरात असलेल्या आवा जमिनीचा सातबारा बुद्धभूमी फाउंडेशनच्या नावे करण्यात यावा या मागणीसाठी बौद्ध धर्म गुरु गौतमरत्न भन्तेजी यांचे नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली महानगरपालिका समोर बेमुदत आंदोलन सुरू आहे या आंदोलनाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ए कामगार आघाडी ठाणे प्रदेश अध्यक्ष, भीमशक्ती क्रांतिकारी संघटना प्रमुख सल्लागार, बहुजन हिताय रिक्षा चालक मालक संघटना प्रमुख सल्लागार मिलिंद वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली आर पी आय कामगार आघाडी ठाणे प्रदेश व भीमशक्ती क्रांतिकारी संघटना 45 गावे यांच्या वतीने आंदोलनाला पाठिंब्याचे पत्र देऊन जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी आर पी आय ए व भीमशक्ती क्रांतिकारी संघटनेच्या वतीने हजारो भीमसैनिक 29 जून रोजी होणाऱ्या भव्य मोर्चा सामील होण्याची ग्वाही संघटनेचे अध्यक्ष सुरेश भोईर तथा मिलिंद वानखेडे यांनी दिली यावेळी आरपीआयए कामगार आघाडी ठाणे प्रदेश उपाध्यक्ष प्रफुल उबाळे, ठाणे प्रदेश सचिव कुशल निकाळे, संघटक सचिव ज्ञानेश्वर हिवाळे, टिटवाळा शहर अध्यक्ष गौरव वानखेडे, भीमशक्ती क्रांतिकारी संघटनेचे सचिव गुरुनाथ जाधव यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवून पाठिंबा जाहीर केला.

आंबिवलीत १३.२५ लाखांचा एमडी जप्त; इराणी तरुणाला अटक, पोलिसांची धडक कारवाई



कल्याण। कल्याण परिमंडळ-३च्या विशेष कारवाई पथकाने आंबिवली परिसरात कारवाई करत १३ लाख २५ हजार रुपये किमतीचा मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ जप्त केला असून एका इराणी तरुणाला अटक करण्यात आली आहे. खडकपाडा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३ कल्याण यांच्या आदेशानुसार विशेष कारवाई पथक आंबिवली परिसरात अंमली पदार्थ विक्रेते, फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी प्रतिबंधात्मक गस्त घालत होते. शुक्रवारी पहाटे सुमारे ३.१० वाजण्याच्या सुमारास वडवलीहून आंबिवलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगेशी बिल्डिंगजवळ पथकाला रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या स्कुटीवरील एका व्यक्तीच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ६६.२६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदाथार्ची किंमत १३ लाख २५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अब्बास हैदर सय्यद इराणी (वय २६, रा. आंबिवली) याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीविरुद्ध यापूर्वीही खडकपाडा पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कारवाई पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र ठोके तसेच पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केली.

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती 'जी' वालीव
दुरध्वनी क्र. ९६६५००३८८७
वालीव नाका, वसई (पुर्व)
ता. वसई, जि. पालघर - ४०१२०८

ईमेल - prabhagsamitiwaliv@gmail.com
जावक क्र. : वविशम १६९/२०२६/२७
दिनांक : २४/०६/२०२६

जाहिर नोटीस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतर कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत / तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
1.	गोखिवरे	GK०३/१३७१६/५१	शांती हाऊस	मोहम्मद उमर शेख व रिजवाना बानो
2.	गोखिवरे	GK०१/१३४२९/३६	गौरी अ पाटील व अमित मो पाटील	गोविंद ह आचार्य व सोनीया गो आचार्या
3.	गोखिवरे	GK१०/४९३	सुमन रघुनाथ संकट	अक्षय रघुनाथ संकट
4.	गोखिवरे	GK०७/१३६०५	प्रमिल धर्मराज यादव	अवधेश कुमार सियाराम यादव
5.	गोखिवरे	GK०६/१४१३९/१२	नेमिनाथ इन्फ्रा एल एल पी	दिवानचंद्र आर चौधरी
6.	गोखिवरे	GK०५/१११७०/४७	साईनगर डेव्हल कॉ	सरोज कांत स्वेन व जयश्री रौतराय
7.	गोखिवरे	GK०३/१३९४३/१०६	श्री इंटरप्रायजेस	आलोक कुमार राय व बबिता आ राय
8.	गोखिवरे	GK०१/११३४७/३०	शाम गोपाल वैती	बलभीम व्यं हेडे व अंजना ब हेडे
9.	गोखिवरे	GK०४/२८०२/३३	कल्पेश अंबालाल चौबीसा	मुकेश भाई झाला व निरुबेन झाला
10.	गोखिवरे	GK०३/१४१६४/३७३	इम्पेरियल लाइफस्टाईल प्रा लि	अवधेश रा चौरसिया व पुष्पादेवी अ चौरसिया
11.	गोखिवरे	GK०३/१४१७२/४९	इम्पेरियल लाइफस्टाईल प्रा लि	अवधेश रा चौरसिया व पुष्पादेवी अ चौरसिया
12.	गोखिवरे	GK०४/२८०२/१४	सविता बा खेडेकर	अंकिता अंकुश चव्हाण व अंकुश ल चव्हाण
13.	गोखिवरे	GK०३/१४१६४/१५३	इम्पेरियल लाईफ स्टाईल प्रा लि	प्रफुल र पुहान व रश्मिता प्र पुहान
14.	गोखिवरे	GK०६/१३९६१/१३५	शांती होम्स रिअल्टी एल एल पी	तरानुम अ अन्सारी व अफरिन अ अन्सारी व अशरफ अन्सारी
15.	गोखिवरे	GK१०/४१८/३	कुंदन श्रीराम चौरसिया	गुडडी आशिष चौरसिया
16.	गोखिवरे	GK०६/१३०९/१२	मेरी ॲन्ने फर्नांडिस	प्रेम गिरजा शंकर यादव व उर्मिला गि यादव
17.	गोखिवरे	GK०३/७८८९/६८/१	सतिश सदानंद भडारे	मोहन लाल
18.	गोखिवरे	GK०३/१३९४६/८५	शांती हाऊस	मोहम्मद जाफर मोहम्मद उमर शेख
19.	गोखिवरे	GK०८/१३५३५/३९४	फातिमा मोहम्मद उमर अन्सारी	सुनील कुमार यादव
20.	गोखिवरे	GK०६/१३९६०/१०२	शांती होम्स रिअल्टी	सुमित सुरेश कदम व पुजा सु कदम

सही /-
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'जी' वालीव
वसई विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com